# महाविद्यालयात छत्रपती शाहू जयंती साजरी




मानसशास्त्र विभागच्या वतीने आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त मार्गदर्शन करताना डॉ.विजयकुमार पाटील समवेत डॉ. एन. डी. मांगोरे, प्रा. जगदीश सरदेसाई, डॉ. एस. एस. कुरलीकर, डॉ. बी. एन. रावण, डॉ. उषा पवार, सौ. तेजस्विनी पाटील, प्रा. ए. आर. महाजन व मान्यवर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक समतेचे प्रणेते होते. त्यांनी स्वातंत्र्य,समता व बंधुता ही त्रिसूत्री अमलात आणून सामाजिक न्याय प्रस्थापित केला. सर्वसामान्यांचे आयुष्य सुखी व समाधानी झाली पाहिजे हा विचार त्यांचा होता अशा या मानवतावादी राजाचा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे त्यांच्या कार्याची माहिती सर्व दूर आपण पोहोचवली पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, मानसशास्त्र विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील बोलत होते.

यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. विजयकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील,ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण, सहसमन्वयक डॉ.एस.एस. कुरलीकर,माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.तेजस्विनी पाटील,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.ए.आर.महाजन होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.जगदीश सरदेसाई यांनी केले आभार प्रा.ए.आर.महाजन यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.एन.डी.मांगोरे यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.